# पाऊस

तुझ्याच आठवांनी चिंब होई जीव हा
मग कशास कौतुक वाटे येता पाऊस हा

सर येता धरतीवरी पाऊस रेषांचे शहारे
तुला स्मरतात का ते आपुले गूज इशारे

नभ जैसा भरून येतो कोंदून उर भरारा
माझ्या मनास जडे काही गूढ पहारा

फुटूनी बांध तयाचां तो बरसूनी होई शांत
माझ्या जीवास छळतो तो सर्वदूर एकांत

गगनात येते कुठूनशी ती दिप्त वीज सुरेख
मजला पुरेल सखये चाहूल तुझी एक

© सचिन पु. कुलकर्णी
- सपु